**शपथेवर पुढील सरतपास श्रीमती देशमुख अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे :—**

४. शपथपत्र **नि.क्र. सि.—१६** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**उलटतपास श्री.वानखेडे विधिज्ञ अर्जदारातर्फे:—**

५. हे म्हणने खरे आहे की अर्जदार यांचे प्रस्तूत प्रकरणामध्ये मी कोणतीही कामगीरी केलली नाही. हे म्हणने खरे आहे की सदर प्रकरण हे माझे काळात झालेले नाही. हे म्हणने खरे आहे की प्रस्तूत प्रकरणामध्ये अर्जदार यांचेसह एकुण २६ वाहकावर पोलीस वॉरंटचा गैरवापर केल्याचे आरोप केले होते. हे म्हणने खरे आहे की अशोक पुंडलीक लेंभाळे यांचे वर सुध्दा तशा प्रकारचे आरोप ठेवण्यात आले होते. हे म्हणने खरे आहे की अशोक पुंडलीक लेंभाळे याचेवर विभागीय चौकशी करुन आरोप सिध्द झाल्यानंतर त्याना १५००/— रुपये द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. हे म्हणने खरे आहे की बडतर्फीचा आदेश अर्जदार याना पोहच झाल्याबाबत पोहच पावती अभीलेखावर दाखल केलेली नाही.

६. हे म्हणने खरे नाही की उत्तरवादी यानी तक्रारदाराला प्रमाणाबा. हेर त्यानी केलेल्या गैरवर्तनापेक्षा जास्त शिक्षा दिलेली आहे. हे म्हणने खरे नाही की अर्जदारानी कोणताही गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्व/—

(अ. दा. तिडके)

न्यायाधीश

दि. १२.१२.२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर.